


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ६१
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.१४ ऑक्टोबर २०२४

## तुळजाभवानी मंदिरात सीमोल्लंघन सोहळा जल्लोषात...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, धाराशिव :** हलगीचा कडकडाट, संबळाचा कर्णमधुर निनाद आणि आई राजा उदोउदोच्या जयघोषात फुलांची आणि कुंकवाची मुक्त उधळण करीत रविवारी पहाटे महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीचा सीमोल्लंघन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. नगरहून आलेल्या मानाच्या पालखीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांनी भल्या पहाटे मोठी गर्दी केली होती.

तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात मंदिरात रविवारी १३ ऑक्टोबर रोजी पहाटे पाचच्या सुमारास तुळजाभवानी मातेचा सीम ोल्लंघनाचा सोहळा पार पडला. श्री तुळजाभवानी मंदिरात पहाटे साडेचार वाजेपासूनच विधीवत पूजा व आरती करुन तुळजाभवानी देवीचे माहेर असलेल्या अहिल्यानगरहून आलेल्या मानाच्या पालखीत देवीची वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. पिंपळाच्या पारावर देवीची पालखी टेकवून पुन्हा मोठ्या भक्तिभावाने आरती करण्यात आली. या भक्तिमय मिरवणुकीनंतर प्रथेप्रमाणे पारंपारिक पद्धतीने मंत्रोच्चार, आई राजा उदो उदोचा जयघोष आणि पारंपरिक वाद्य संबळाच्या साथीने सर्व विधी करण्यात आले. तुळजाभवानी देवीची मूर्ती ही चल मूर्ती असल्याने ती सिंहासन सोडून सीमोल्लंघन करण्यासाठी भाविकांच्या बरोबर मंदिराच्या बाहेर येते. सीमोल्लंघनानंतर देवीची मूर्ती पुन्हा पौर्णिमेपर्यंत निद्रा अवस्थेत जाते. यावेळी देवीच्या मुर्तीला इजा होऊ नये म्हणून १०८ साड्या परिधान करण्यात येतात. शेवटी प्रथेनुसार अहिल्यानगरच्या भक्तांनी देवीची पालखी तोडून पालखीचे होमात विसर्जन केले. यावेळी उपस्थित सर्व भाविकांनी कुंकू व फुलांची उधळण करत आई राजा उदो-उदोचा जल्लोष केल्याने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला.

यावेळी मंदिरातील धार्मिक कार्यक्रमास श्री तुळजाभवानी मंदिरात जिल्हाधिकारी तथा मंदिर संस्थानचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे, आमदार राणाजगजितसिंह पाटील, तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) माया माने, मंदिर संस्थानचे सर्व पदाधिकारी यांच्यासह पाळीकर पुजारी मंडळ, उपाध्ये पुजारी मंडळ व भोपे पुजारी मंडळाचे पदाधिकारी तसेच भाविक म ोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ताटात हात घातल्याने तरुणाचा खून

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, पुणे :** दारु प्याल्यानंतर ताटात हात घातल्याने झालेल्या वादातून तरुणाला बेदम मारहाण करून त्याच्या खून करण्यात आल्याची घटना सिंहगड रस्ता परिसरात मध्यरात्री घडली. तरुणाला बांबू, तसेच दगडाने मारहाण करून खून करण्यात आला. याप्रकरणी पाचजणांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

आदित्य घोरपडे (वय २१, रा. घोरपडे चाळ, गारमाळ, धायरी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी आकाश ऊर्फ नन्या परदेशी, तसेच त्याचा सावत्र भाऊ सुरेश शुक्ला यांच्यासह पाचजणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत आदित्य याची आई राजश्री संतोष घोरपडे यांनी सिंहगड रस्ता पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. धायरी रस्त्यावरील त्रिमुर्ती किराणा दुकानासमोर मध्यरात्री एकच्या सुमारास ही घटना घडली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आदित्य घोरपडे आणि त्याचे मित्र नऱ्हे येथील गॅलक्सी रेस्टो बार येथे दारु प्यायला गेले होते. दारु प्याल्यानंतर त्यांनी जेवण मागविले. जेवण करीत असताना आकाश हा आदित्य याच्या ताटात हात घालून खाऊ लागला. तेव्हा आदित्यने माझ्या ताटातील घेऊन कशाला खातो, अशी विचारणा केली. आदित्य आणि आकाश दारुच्या नशेत होते. त्यांच्यात तेथे वाद झाला. त्यानंतर आकाश तेथून निघून गेला. आदित्य आणि त्याचे मित्र जेवण करुन बाहेर पडले. धायरी रस्त्यावरील त्रिमूर्ती किराणा माल दुकानासमोर मध्यरात्री एकच्या सुमारास आकाश आणि त्याच्याबरोबर असलेल्या मित्रांनी आदित्यला गाठले. त्याला बांबूने बेदम मारहाण केली, तसेच त्याच्या डोक्यात दगड मारला. या घटनेत तो गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला होता.

या घटनेची माहिती मिळताच पोलीस उपायुक्त संभाजी कदम, अमोल झेंडे, निखिल पिंगळे, सहायक आयुक्त अजय परमार, साईनाथ ठोंबरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राघवेंद्रसिंह क्षीरसागर, गुन्हे निरीक्षक अतुल भोस यांनी घटनास्थळी धाव घेतली. पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यात येत असून, पोलीस निरीक्षक भोस तपास करत आहेत.

## मनसे आगामी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढणार – राज ठाकरे यांची घोषणा

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१३, डोंबिवली (ठाणे) :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेना (म नसे) संपूर्ण ताकदीने निवडणूक लढवणार असल्याची घोषणा पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केली आहे. मनसे पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलताना ठाकरे यांनी स्पष्ट केले की, पक्ष कोणत्याही युती किंवा आघाडीत सहभागी होणार नाही आणि निवडणूक स्वबळावरच लढवणार आहे.

राज ठाकरे म्हणाले, आम्ही कोणत्याही पक्षाशी युती किंवा आघाडी करणार नाही. महाराष्ट्राच्या जनतेला एक सक्षम पर्याय देण्यासाठी आम्ही स्वतंत्रपणे निवडणूक लढवणार आहोत. निकालानंतर मनसे हा सत्तेत सहभागी होणारा पक्ष असेल. लोकांनी आम्हाला एक संधी




दिल्यास महाराष्ट्राला नव्या उंचीवर नेऊ. जगाला हेवा वाटेल असा महाराष्ट्र घडवायची माझी प्रामाणिक इच्छा आहे.

राज ठाकरे यांनी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांवरही जोरदार टीका केली. आमदार-खासदार फोडणे, सत्ता मिळवण्यासाठी विचारांशी प्रतारणा करणे हेच गेल्या पाच वर्षांपासून सुरू आहे. महाराष्ट्राच्या जनतेने यंदा चुकीचा निर्णय घेतला, तर राज्याचा ऱ्हास अटळ आहे, असे त्यांनी विधान केले.

ते पुढे म्हणाले, महाराष्ट्राच्या जनतेला फुकटच्या योजना नकोत; लोकांना रोजगार आणि कामाची गरज आहे. 'लाडकी बहीण' योजनेसारख्या घोषणा करून लोकांना गंडवणे हे सरकारचे काम नाही. आम्ही सत्तेत आलो तर जातीच्या आधारावर नव्हे, तर गुणवत्तेच्या आधारावर रोजगार देऊ. राज ठाकरे यांनी जनतेला आवाहन केले की, निवडणुकीत इतर पक्ष पैसे वाटतील, ते पैसे जरूर घ्या, कारण ते तुमचेच आहेत. पण मतदान मात्र मनसेच्या उमेदवारालाच करा. मला एकदा महाराष्ट्र सांभाळायला दिला, तर राज्य कधीही दिल्लीच्या पुढे झुकणार नाही, अशी ठाम ग्वाहीही त्यांनी दिली.

## बाळकडू फाउंडेशन तर्फे गरजूंना वैद्यकीय मदत



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. १३, मुंबई :** वंदनीय हिंदुरुदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रेरणेने स्थापन झालेले बाळकडू फाउंडेशन गेले अनेक वर्ष सामाजिक कार्यातून लोकांची मदत करत आहे. गुरुवार दिनांक १० ऑक्टोबर २०२४ रोजी शिवडी येथे राहत असलेल्या सविता मोरे यांना डायलिसिस नंतर लागणारी इंजेक्शन आणि औषधे बाळकडू फाउंडेशनचे मार्गदर्शक व लालबाग परळचे कार्यसम्राट नगरसेवक अनिल कोकीळ यांच्या हस्ते के.इ.एम. रुग्णालया समोरील श्री स्वामी समर्थ मेडिकल येथे त्यांना देण्यात आले. यावेळी सोबत बाळकडू फाउंडेशनचे अध्यक्ष राज पोवार आणि उपाध्यक्ष सागर मांगले व गिरीश विचारे उपस्थित होते. एक हात मदतीचा या योजनेअंतर्गत बाळकडू फाउंडेशन गरजू लोकांना आपल्या फाउंडेशनच्या मार्फत मदत करत आहे. सामाजिक आणि शैक्षणिक विभागांमध्ये बाळकडू फाउंडेशन मदत करत आहे.

## देवेंद्र फडणवीस म्हणतात, 'बाबा सिद्दिकींची हत्या ही दुर्दैवी घटना...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, गोंदिया :** महाराष्ट्र राज्यात काल दसरा सण साजरा करीत असताना मुंबईत बाबा सिद्दिकी यांच्या कार्यालयात त्यांच्यावर गोळीबार झाल्याची आणि त्यात त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घडलेली ही अतिशय दुःखद व गंभीर अशा प्रकारची घटना आहे.

बाबा सिद्दिकी यांच्याशी राजकीय संबंध तर होतेच माझी स्वतःची निकटची मैत्री देखील होती. अनेक वर्षे आम्ही सोबत काम केलं त्यामुळे अशा प्रकारे जी घटना घडली आहे त्यामुळे आम्हा सगळ्यांना धक्का बसलेला असल्याची माहिती उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना दिली. रविवार १३ ऑक्टोबरला गोंदिया जिल्ह्यातील तिरोळा येथे विविध विकास कामाचे उद्घाटन आणि लोकार्पण करण्याकरिता ते आले होते. माजी आमदार बाबा सिद्दिकी यांच्या हत्ये विषयी माहिती देताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की आतापर्यंत या प्रकरणी मुंबई पोलिसांकडून दोन आरोपी पकडण्यात आले आहेत.

त्यांच्यावर कसून चौकशी मुंबई पोलीस पथकाकडून केली जात आहे काही धागेदोरे त्यातले पोलिसांनी मिळालेले आहेत तिसऱ्या आरोपीच्या शोधात पोलीस पथकाची चार पथके इतर राज्यात जाऊन चौकशी करीत आहे एक पथक इंदूर तर एक पथक उज्जैनला पाठविण्यात आलं आहे. काही इतरही अँगल्स त्यातले पोलिसांना लक्षात येत आहेत पण त्या संदर्भात आता लगेच बोलणे योग्य होणार नाही आज त्या अटक मध्ये असलेल्या आरोपींना कोर्टात हजर करण्यात येणार



आहे त्यानंतर त्या संदर्भात जेवढी माहिती देता येणार तेवढी माहिती पोलीस ब्रीफिंग करतील आणि त्या संदर्भातील सगळी माहिती पोलीस देणार असल्याचीही माहिती फडणवीस यांनी दिली.

काल घडलेल्या या घटनेनंतर विरोधक सरकारवर टीका करीत आहेत या प्रश्नाच्या उत्तरात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की मला असं वाटते की विरोधकांना केवळ सत्ताच पाहिजे आहे. राज्यात इतकी दुर्दैवी आणि गंभीर घटना झाल्यावर विरोधकांच्या नजरेसमोर फक्त खुर्चीच आहे. आमच्या नजरेसमोर महाराष्ट्र, महाराष्ट्राच्या विकास आहे. आम्हाला महाराष्ट्राच्या सुरक्षे कडे पाहायचा आहे त्यामुळे ते खुर्चीकडे पाहतायेत त्यांनी खुर्चीकडे बघावे आणि जे बोलायचे आहेत ते बोलावे आम्ही आमच्या काम योग्य पद्धतीने करीत आहोत आम्ही त्यांची पर्वा करीत नाही असेही फडणवीस म्हणाले.

याप्रसंगी फडणवीस यांच्यासोबत तिरोडाचे आमदार विजय रहांगडाले, गोंदिया जिल्हा परिषदेचे अध्यक्ष पंकज रहांगडाले, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाचे माजी आमदार राजेंद्र जैन, भाजप नेते मदन पटले, तिरोडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती पिंटू रहांगडाले आदि उपस्थित होते.

## बाबा सिद्दीकींची हत्या कशी झाली?

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. १३, मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांची शनिवारी दसऱ्याच्या दिवशी रात्री ९ च्या सुमारास हत्या करण्यात आली. बाबा सिद्दीकी हे त्यांचा मुलगा झिशानच्या कार्यालयात चालले होते. त्यावेळी तीन हल्लेखोरांनी त्यांच्यावर गोळीबार केला. या गोळीबारानंतर बाबा सिद्दीकींनी रुग्णालयात नेण्यात आलं. पण त्यांची प्राणज्योत मालवली.

**बाबा सिद्दीकींच्या हत्या प्रकरणात दोघांना अटक**

बाबा सिद्दीकींच्या हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला. या प्रकरणात दोन आरोपींना अटक करण्यात आली. तर तिसरा आरोपी फरार आहे. त्या आरोपीचा शोध घेणं सुरु आहे. या प्रकरणाने मुंबईसह महाराष्ट्र हादरला आहे. पोलिसांनी या प्रकरणात दोघांना अटक केली तर तिसऱ्या आरोपीचा शोध पोलीस घेत आहेत. हे दोघेही बिश्नोई गँगशी संबंधित असल्याचीही माहिती समोर आली आहे. बाबा सिद्दीकी यांची हत्या झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांच्या राजीनाम्याची मागणी होते आहे. मात्र देवेंद्र फडणवीस यांनी यावरुन विरोधकांना उत्तरही दिलं आहे.

**एका आरोपीला पोलीस कोठडी...**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बाबा सिद्दीकी हत्या प्रकरणात गुरुमीत सिंग, धर्मराज कश्यप या दोघांना अटक करण्यात आली. त्यांना आज न्यायालयात हजर करण्यात आलं. त्यानंतर न्यायालयाने गुरुमीत सिंगला २१ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. धर्मराज कश्यप याची हाडासंदर्भातली एक चाचणी करण्यात येणार आहे. आरोपी धर्मराज कश्यपने त्याचं वय कोर्टात १७ वर्षे असं सांगितलं. त्यामुळे न्यायालयाने या प्रकरणी त्याच्या वय निश्चितीसाठी हाडांची चाचणी करण्यासंबंधीचे निर्देश दिले आहेत. या चाचणीचा अहवाल आल्यानंतर त्याच्याविषयीचा निर्णय घेतला जाणार आहे. तर गुन्हे शाखेने सगळा घटनाक्रम सांगितला आहे. या प्रकरणात आरोपींनी बाबा सिद्दीकींच्या हत्येसाठी तीन लाखांची सुपारी घेतल्याची माहिती मुंबई पोलिसांनी आज न्यायालयात दिली.

## बाबा सिद्दीकींच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि. १३, मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार ) नेते बाबा सिद्दीकी यांची शनिवारी रात्री गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. आज मरीन लाईन्स येथील बडा कब्रस्तान येथे त्यांचा शासकीय इतमामात दफनविधी करण्यात आला आहे. आज सायंकाळीच त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली होती. यावेळी बॉलिवूड कलाकारांसह राजकीय नेत्यांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित असल्याचंही बघायला मिळालं.

आज सकाळी बाबा सिद्दिकी यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी त्यांच्या वांद्रे येथील निवासस्थानी ठेवण्यात आलं होतं. त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी सलमान खान, संजय दत्तसह अनेक बॉलिवूड सेलिब्रिटी तसेच राजकीय नेते याठिकाणी दाखल झाले होते. तसेच नागरिकांनी याठिकाणी मोठी गर्दी केली होती. शनिवारी रात्री बाबा सिद्दीकी यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. ते वांद्रे येथील खेरवाडी सिग्नलजवळ झिशान सिद्दीकी यांच्या ऑफिसमध्ये चालले होते. त्यावेळी तिघांनी बाबा सिद्दीकी यांच्यावर चार ते पाच राऊंड फायर केले. यापैकी दोन राऊंड बाबा सिद्दीकी यांच्या छाती आणि पोटावर लागले होते. त्यामुळे त्यांना तत्काळ लिलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, रुग्णालयात पोहोचण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला होता. या गोळीबारात त्यांच्या एका सहकाऱ्यांच्या पायालाही गोळी लागली होती.

## संपादकीय



### चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू

हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया व्यक्तिमत्त्व असलेले किशोर कुमार यांचा आज स्मृतिदिन. आजच्याच दिवशी म्हणजे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी किशोर कुमार यांचे निधन झाले. किशोर कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीला लाभलेले अनमोल रत्न आहे. चित्रपट निर्मितीतील असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात त्यांचा सहभाग नाही. पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, अभिनेता, पटकथा लेखक असे चित्रपट निर्मितीतील सर्वच प्रकारात त्यांनी मुक्त विहार केला. किशोर कुमार यांचे मूळ नाव आभास कुमार गांगुली असे होते. ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्यप्रदेशातील खांडवा येथे किशोर कुमार यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते तर आई गौरादेवी या गृहिणी होत्या. त्यांचे थोरले बंधू अशोक कुमार आणि अनुप कुमार हे दोघेही हिंदी चित्रपट सृष्टीत नायक म्हणून कार्यरत होते. किशोर कुमार हे देखील आपल्या भावांप्रमाणे चित्रपट सृष्टीत नशीब आजमावण्यासाठी धडपडत होते. १९५० साली कुंजलाल गांगुली यांनी किशोर कुमार यांना मुक्कदर या चित्रपटात काम दिले. १९५२ ते १९६० या दरम्यान किशोर कुमार यांनी बऱ्याच चित्रपटात काम केले. नोकरी, अधिकार, धोबी डॉक्टर, ईलजाम, मिस माला, झलक हे चित्रपट त्यांनी १९५४ या एकाच वर्षात पूर्ण केले. १९५६ साली तर त्यांनी ९ चित्रपटात भूमिका केल्या. हा त्याकाळी एक विक्रम होता. त्यानंतर ते अभिनयासाठी गायनही करु लागले. अभिनय आणि गायन असा त्यांचा समांतर प्रवास सुरू झाला. किशोर कुमार यांनी आपल्या मिश्किल स्वभावाने चित्रपट सृष्टीत विनोदी भूमिकांचा नवा ट्रेंड आणला. अभिनय करताना गायन आणि संगीताचा तालावर थिरकने असा नवा ट्रेंड त्यांनी सुरू केला. किशोर कुमार यांच्या या नवीन स्टाईलने तरुणांना भुरळ घातली. त्याकाळातील सर्व दिग्गज नायिकांसोबत त्यांनी भूमिका केल्या. मधुबाला सोबत त्यांची जोडी विशेष जमली. अभिनयासोबत गायनातही ते यशस्वी होऊ लागले. त्यांची गाणी लोकप्रिय होऊ लागली. किशोर कुमार यांना संगीतकार सचिन देव बर्मन यांनी अनेक संधी दिल्या. सचिन देव बर्मन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्यांनी गायलेली सर्व गाणी लोकप्रिय झाली. पुढे सचिन देव बर्मन यांचे चिरंजीव राहुल देव बर्मन उर्फ पंचमदा यांच्याशी जोडी जमली या जोडीने अनेक लोकप्रिय गाणी चित्रपट सृष्टीला दिली. लता मंगेशकर आणि आशा भोसले यांच्यासोबत त्यांनी शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. किशोर कुमार यांनी तीन दशकांहून आधीक काळ गायन केले. देव आनंद यांच्यापासून अनिल कपूर यांच्यापर्यंत सर्वच नायकांना त्यांनी आवाज दिला. किशोर कुमार यांचा आवाज ज्या नायकासाठी वापरला गेला तो नायक स्टार बनला. राजेश खन्ना यांना बॉलिवूडचा सुपरस्टार बनवण्यामागे किशोर कुमार यांचाही मोठा हात आहे. राजेश खन्ना यांच्या सर्व चित्रपटांमध्ये किशोर यांचाच आवाज वापरला गेला. आराधना पासून जमलेल्या या जोडीने पुढे इतिहास घडवला. या जोडीची सर्व गाणी हिट झाली. ज्या ज्या वेळी राजेश खन्ना यांचे नाव निघते त्या त्या वेळी किशोर कुमार यांचेही नाव घेतले जाते. किशोर कुमार यांनी ४०० हुन अधिक चित्रपटात शेकडो गाणी गायली ती सर्व लोकप्रिय झाली. नायक, गायक यासोबत ते दिग्दर्शकही होते. चलती का नाम गाडी यासारख्या विनोदी चित्रपटसोबतच दूर गगन की छाव मे यासारखा गंभीर चित्रपटही त्यांनी काढला. त्यांनी काही चित्रपटांना संगीतही दिले तर काही चित्रपटांसाठी गाणीही लिहिली. किशोर कुमार यांनी चित्रपटाच्या पटकथाही लिहील्या. असा हा हिंदी चित्रपट सृष्टीतील अवलिया अष्टपैलू १३ ऑक्टोबर १९८७ रोजी जगाला अलविदा करून कायमचा निघून गेला. किशोर कुमार यांच्या जादुई आवाजाची मोहिनी आजही कायम आहे. आजही त्यांची गाणी पूर्वीइतकीच लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांनी चित्रपट सृष्टीवर असा ठसा उमटवला आहे की त्यांच्या नावाशिवाय हिंदी चित्रपट सृष्टीचा इतिहास पूर्ण होऊ शकत नाही.

किशोर कुमार यांना स्मृतिदिनी
विनम्र अभिवादन!

# 'लाईट ऑफ लाईफ' बदलतंय ग्रामीणांचे आयुष्य !

**अक्षराज : मानसी कांबळे**

**दि.१३, कर्जत :** ग्रामीण भारताचे चित्र अधिक सक्षम, संतुलित करण्याच्या उद्देशाने मागील १९ वर्षापासून 'लाईट ऑफ लाईफ' ट्रस्ट नावाची संस्था झटत आहे. या कालावधीत जवळपास ५ लाख ४८ हजार ३९ लोकांना विविध उपक्रम आणि योजनांचा लाभ ट्रस्टच्या माध्यमातून देण्यात आला आहे. आनंदो आणि जागृती या कार्यक्रमाच्या माध्यमातून शिक्षण, प्रशिक्षण, समुदाय, कौशल्य विकास, आरोग्य सेवा आणि पर्यावरण संवर्धनात 'लाईट ऑफ लाईफ'चा मोठा सहभाग राहिला आहे.

कर्जत तालुक्यातील तिवरे येथे असलेल्या 'लाईट ऑफ लाईफ' ट्रस्टच्या केंद्राला पत्रकारिता प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी भेट देवून ट्रस्टचे कार्य जाणून घेतले. तिवरे येथे 'लाईट ऑफ लाईफ' ट्रस्टच्या जागृती विभागाचे कौशल्य विकास केंद्र असून या माध्यमातून व्यावसायिक प्रशिक्षण व मार्गदर्शन केले. या केंद्रात संगणक प्रशिक्षण, टेलरींग कोर्सेस, ब्युटीशियन कोर्सेस, बाईक रिपेअरींग कोर्सेस, एसी (अउ) रिपेअरींग कोर्सेस तसेच पर्यावरण संवर्धनाचे धडे गिरविले जातात.

**महिला सक्षमीकरणासाठी ब्युटी पार्लर प्रशिक्षण :-**

महिला सक्षमीकरण आणि रोजगार हा उद्देश डोळ्यांसमोर ठेऊन 'लाईट ऑफ लाईफ' ट्रस्ट जागृती विभाग हे अनेक उपक्रम राबवित असतात. त्यातीलच एक उपक्रम म्हणजेच ब्युटी पार्लर प्रशिक्षण. लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट जागृती विभाग यांच्या कर्जत, तिवरे, कडाव, कशेळे, मोहिली अशा पाच ठिकाणी शाखा आहेत. या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे महिलांना अल्पदरात प्रशिक्षण आणि मार्गदर्शन करून रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी प्रयत्न केले जातात. आतापर्यंत ३-४ हजार महिलांना या उपक्रमामुळे रोजगार उपलब्ध झाला आहे.

**गरजू महिला, मुलींना टेलरिंगचे बेसिक ट्रेनिंग :-**

कर्जत लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट जागृती सेंटरच्या माध्यमातून डॉक्टर विली मॅडम यांच्या आशिर्वादाने व

जागृतीचे मुख्य व्यवस्थापक गौतम कनोजे यांच्या नेतृत्वाखाली समाजातील गरीब वंचित लोकांसाठी रोजगार तसेच आरोग्याची काळजी घेण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जात आहेत. तालुक्यातील सर्वच केंद्रामध्ये कॉम्प्युटर, टेलरिंग, मेकॅनिकल, एसी रिपेअर, इलेक्ट्रिशियन यासारखे कोर्स राबवून अत्यल्प पैशांमध्ये समाजातील गरीब विद्यार्थ्यांना मूळ प्रवाहात आणण्याचे काम लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट करीत आहे.

टेलरिंग हा तसा महिलांच्या जवळचा विषय आहे. बऱ्याच गरीब, बेरोजगार स्त्रिया, मुली आपले घर चालविण्यासाठी टेलरिंग करीत असतात. ट्रेनिंगचे समाजातील महत्त्व आणि गरजा ओळखून 'लाईट ऑफ लाईफ' ट्रस्टने त्याचे रीतसर प्रशिक्षण तिवरे येथे सुरू केले आहे.

या ट्रस्टमध्ये २००९ पासून गरजू महिला, मुलींना टेलरिंगचे बेसिक ट्रेनिंग देण्यात येत आहे. तसेच त्या मुलींना बेसिक येते, त्या मुलींना ॲडव्हान्स ट्रेनिंगचेही सुविधा येथे करण्यात आली आहे. हे सर्व ट्रेनिंग ट्रेनर नीता बडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. तसेच मुलींना याच ट्रस्टच्या माध्यमातून



आजूबाजूच्या शाळा, कॉलेज, आश्रम आदी सामाजिक संस्था यांच्याकडून ऑर्डर घेऊन काम देऊन रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम केले जाते. प्रोडक्शन इन्चार्ज रवी भोईर हे सर्व खरेदी-विक्री, मार्केटिंगचे काम बघतात. पूर्वी प्रत्येक मुलीला शिलाई मशीन व संपूर्ण किट्स दिले जात होते परंतु डोनर नसल्याने आता फक्त शिलाई मशीन किट देण्यात येत आहे. आतापर्यंत लाईट ऑफ लाईट ट्रस्ट या ट्रस्टच्या माध्यमातून जवळजवळ ५० ते ६० महिलांना टेलरिंगचे संपूर्ण प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा :-**

रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात गेली २० वर्ष आपल्या विविध उपक्रमातून लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट कर्जत वासियांना तसेच आदिवासी पाडे व वस्त्यांमध्ये आपली सेवा पुरवित आहे.

लाईट ऑफ लाईफ ट्रस्टच्या आरोग्य विभागातील डॉ. गितांजली (राव) हजारे व त्याची टीम सारीका झोमटे, डॉ. सुजाता मिनमिन, माधुरी देशमुख, केशव कवठे व कल्पेश जाधव यांच्या साथीने आदिवासी वाडीवस्त्यांतील व शाळांतील विद्यार्थ्यांना आरोग्यविषयी शिक्षण तसेच मार्गदर्शन केले जाते.

याबाबत डॉ. गितांजली (राव) हजारे व सारीका झोमटे यांनी दिलेल्या माहितीनुसार लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट तर्फे कर्जत तालुक्यातील ४० गावे व आदिवासी पाडे यामध्ये दर शुक्रवारी गावात व शाळेमध्ये शिबीर भरवले जाते व तेथील रहिवाशांची तपासणी केली जाते व त्यांना मोफत औषध दिले जाते.

यासाठी त्याच्यांकडून मात्र २० रूपये फी आकारली जाते. जर एखाद्याचा आजार मोठा असेल तर त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन केले जाते. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना सकाळी दात स्वच्छ करताना ब्रश कसा वापरायचापासून दिवसभरात स्वतःच्या शरीराची तसेच परिसराची स्वच्छता कशी ठेवायची तसेच दररोजच्या आहाराबाबत प्रशिक्षण दिले जाते व दर शुक्रवारी त्यांची आरोग्य तपासणी केली जाते.

**अल्पदरात संगणक प्रशिक्षण :-**

दैनंदिन व्यवहारातील अंत्यत गरजेचे असलेले संगणक प्रशिक्षण हे अंत्यत आवश्यक आहे. परंतु गरजु आणि शिकाऊ मुलांना ज्यांच्या पर्यंत या सुविधा पोहोचत नाहीत. त्यांच्यासाठी मुबलक दरात लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आयोजित जागृती विभाग तिवरे येथे संगणक प्रशिक्षण हे सुरु आहेत. कर्जत, कडाव, कशेळे येथे शाखा उपलब्ध असून ३ ते ४ हजार विद्यार्थी या संगणक प्रशिक्षणामध्ये सहभागी आहेत. एमएससीआयटी, टॅली, ॲडव्हान्स एक्सेल, मराठी टायपिंग, इंग्लिश टायपिंग, ग्राफिक डिजायनिंग असे विविध संगणक प्रशिक्षण उपलब्ध आहेत.

तसेच तिवरे येथील शाखेमध्ये संगणक प्रशिक्षण उपक्रमामध्ये राजेश भोईर, विशाल माळी हे प्रमुख असून वैशिष्ट्य म्हणजे संगणक प्रशिक्षण देऊन नोकरी मुलाखतीची देखील तयारी करून घेतली जाते असे येथील संगणक शिक्षक विशाल माळी यांनी सांगितले.

**पर्यावरण संवर्धन काळाची गरज :-**

पर्यावरण रक्षण ही काळाची गरज ठरलेली असताना कर्जत तालुक्यातील तिवरे येथे लाईट ऑफ लाईफ ट्रस्ट आयोजित जागृती विभाग पर्यायवरण संवर्धन विभागाद्वारे पर्यावरण विषयक विविध उपक्रम राबविले जातात. येथील कर्जत, खालापुर, मुरबाड प्रमुख तीन शाखा आहेत. २०१४ पासुन सुमारे २ लाख ६० हजार झाडांचे वृक्षारोपण केले आहे. आंबा, पेरू अशा फळ झाडांची लागवड केली आहे.

तसेच शेतकऱ्यांना शेती कामी पर्यावरण संवर्धनाचे वर्षभरात १२ ट्रेनिंग दिल्या जातात. रोटरी क्लब यांच्या माध्यमातून मिनी सोलार उपलब्ध असून यांमध्ये इर्शालवाडी, उंबरवाडी, नांदगाव या गावांचा समावेश आहे. या पर्यावरण संवर्धन उपक्रमामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळत आहे. यामध्ये पर्यावरण संवर्धन विभागातील प्रमुख कन्हैया सोमणे, निकेश सावंत, सुरज आगिवले, संतोष शिद, प्रकाश कांबळी, सुभाष अहिमकर यांची मेहनत आहे.

### ठपका...

तपास यंत्रणा सज्ज
तो डामडौल भपका
गाडीभर कागद पत्रे
न पुराव्यांचा झपका

छोट्या प्याद्यां वरती
सहज ठेवति ठपका
काळीकुट्टकारस्थाने
पुसा टिंबाचाठिपका

गुन्हा घेई अंगावरती
भला होगा रे सबका
आपण चालवे गाडी
गरिबामाथी पाप का

नगाला नग मिळाला
फोडता निष्पाप का
विकतघेई माणूसकी
दयामाया ना चाबका

मूळ गुन्हेगार मोकाट
पोलीसालागे धापका
व्यवस्थेत अस्वस्थता
कु कृत्या ना चाप का

सही सलामत सुटलो
तरी येई ना झोप का
मनातलपला गुन्हेगार
स्वताकरालं माफ का


**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# ई-कचऱ्याविषयी जागरूकता हवी...

आज १४ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक ई कचरा दिवस म्हणून साजरा केला जातो. ई कचरा कमी करणे आणि ई कचऱ्याचा पुनर्वापर या बाबत जनजागृती करणे हा या दिवसा मागचा उद्देश आहे. २०१८ साली पहिल्यांदा जागतिक कचरा दिवस साजरा करण्यात आला. पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठी धोकादायक असलेला ई कचरा ही जगातील आज सर्वात मोठी समस्या बनली आहे. आपल्या रोजच्या जगण्यामध्ये इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल सेवांचा वापर जसा वाढत चालला आहे तसतसा इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा डोंगरही वाढत चालला आहे.

उपयुक्तता संपलेल्या आणि तांत्रिक बिघाडामुळे वापरण्यायोग्य नसलेल्या वस्तू फेकून दिल्या जातात आणि मग त्याचा ई कचरा बनतो. फक्त महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रात दरवर्षी ५० हजार टन हून अधिक ई कचरा जमा होतो तर देशात ५ लाख टन ई कचरा वर्षाला तयार होतो. महाराष्ट्र खालोखाल आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यात सर्वाधिक ई कचरा तयार होतो. आपल्या देशातच इतका ई कचरा तयार होत असेल तर जगात किती ई कचरा तयार होत असेल याचा विचार न केलेलाच बरा.

ई कचऱ्याची समस्या इतकी गंभीरपणे आ वासून उभी असतानाही आपण ई कचऱ्या विषयी जागृत नाही. काहींना तर ई कचरा म्हणजे काय हे देखील माहीत नाही. ई कचरा म्हणजे तुमच्या आमच्या घरातील निकामी झालेल्या किंवा वापरात नसलेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तू ज्या सहजपणे आपण इतर कचऱ्यासोबत बाहेर फेकतो. या कचऱ्याचा निचरा देखील आपण इतर कचऱ्या



प्रमाणेच करतो. घरगुती वापरातील टीव्ही, टेप, रेडिओ, टू इन वन, फ्रिज, मिक्सर, वॉशिंग मशीन, कुलर, एअर कंडिशनर, इलेक्ट्रॉनिक कुकर, मायक्रोव्हेव, ओव्हन, हीटर, पंखे यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तू निकामी झाल्या की त्याला ई कचरा असे संबोधले जाते. यासोबतच महिति तंत्रज्ञान क्षेत्रातील उपकरणे जसे संगणक, लॅपटॉप, टॅब, फोन, मोबाईल, बॅटरी, सर्किट बोर्ड, हार्ड डिस्क, पेन ड्राईव्ह, सिडी, व्ही सिडी यांचा ई कचऱ्यात समावेश होतो. अशा प्रकारे निकामी झालेल्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंना ई कचरा असे म्हणतात.

इलेक्ट्रॉनिक वस्तूंमध्ये भरपूर प्रमाणात सजीवांना अपायकारक घटक असतात. हे अपायकारक घटक पर्यावरणातील हवा, मती आणि पाण्यात मिसळले की सभोतालची हवा, पाणी आणि माती दूषित होती. मोबाईलची किंवा कोणत्याही बॅटरीची निर्मिती शिसे वापरून केली जाते. हे शिसे पावसाच्या पाण्यात झिरपून हवेतील आर्द्रतेमध्ये मिसळून संबंधित हवा, पाणी आणि दूषित होते. अमेरिकेतील एका पर्यावरण संवर्धन संस्थेच्या म्हणण्यानुसार दरवर्षी ३० दशलक्ष संगणक निकामी झाले की फेकून दिले जातात. यापैकी वीस टक्क्यांहून कमी संगणकाचे पूनार्विनिकरण केले जात नाही. युरोपमध्ये तर दरवर्षी सुमारे १०० दशलक्ष फोन फेकून दिले जातात. कालबाह्य ठरलेली, निकामी झालेली ही उपकरणे पर्यावरणातील जागा वेगाने व्यापत आहेत. निष्काळजीपणे फेकलेल्या काही उपकरणांमध्ये बोरोलियम, कॅडीमियम, पारा आणि शिसे यासारखी घातक घटक असतात. या घटकांना वातावरणात संमिश्र होण्यास अवकाश लागत असला तरी खूप जास्त प्रमाणात जेंव्हा हे वातावरणात मिसळले जातात तेंव्हा पर्यावरणाची मोठी हानी होते. एकूणच ई कचऱ्यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. हे लक्षात घेता ई कचऱ्याच्या समस्येवर वेळीच आणि गांभीर्याने विचार करण्याची नितांत गरज आहे.

ई कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी विशिष्ट प्रक्रिया अवलंबणे आवश्यक आहे. त्याचा निचरा इतर कचऱ्यासोबत न करता त्याचा निचरा करण्यासाठी भिन्न प्रक्रिया राबवली पाहिजे. ई कचऱ्याचे नियोजन आणि विल्हेवाट लावण्याच्या प्रक्रियेत या कचऱ्याचे संकलन त्याचे रिसायक्लिंग आणि त्याचे मॅन्यूफॅक्चरिंग महत्वाचे आहे.

त्यासाठी सार्वजनिक व खाजगी क्षेत्राने संयुक्त रुपात पायाभूत सुविधा उभाराव्या लागतील. पर्यावरण मंत्रालयाने सादर केलेल्या ई कचरा व्यवस्थापन नियम २०२२ च्या मसुद्यात ई कचरा व्यवस्थापनामध्ये उत्पादक, पुनर्वापर संस्था आणि संघटना सर्वांची जबाबदारी निश्चित केली गेली आहे. ती जबाबदारी प्रत्येक घटकाने पार पाडल्यास काही प्रमाणात ही समस्या मिटेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## आ.मकरंद पाटील यांच्यावर शिवसेनेच्या पुरुषोत्तम जाधव यांची टीका



**अक्षराज : दशरथ राऊत**

**दि.१३, खंडाळा :** खंडाळा येथे जनसंवाद यात्रेनिमित्त शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान आमदार मकरंद पाटील यांच्यावर (शनिवार दि.१२) रोजी टीका केली.ते म्हणाले युती ही प्रामुख्याने शिवसेना आणि भाजपची आहे.पण खंडाळा तालुक्यात विद्यमान आमदार मकरंद पाटील यांनी अन्याय केला असून ते न्याय देत नाहीत. आणि मी खंडाळा तालुक्यातील जनतेला न्याय देण्याचा प्रयत्न सुरू असतो अशी टीका शिवसेना जिल्हाप्रमुख पुरुषोत्तम जाधव यांनी केली.

## गायरान जमिनीवरील अतिक्रमणे कायम करुन नागरिकांना ८ 'अ' देण्याची मागणी

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१३, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील डिकसळ येथील गायराण जमीन सर्व्हे नं.(३०)मध्ये गेल्या (५०) वर्षांपासून अतिक्रमण करुन नागरीक वास्तव्य करत आहेत परंतु सदरील ठिकानचे ८ 'अ' अद्यापही नागरिकांना मिळाले नसल्याने बहुजन जनता पक्षाच्या वतीने पक्षाचे जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देउन मागणी केली आहे. दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की, डिकसळ येथील शासनाच्या गायरान जमिनीवरील सर्वे नंबर(३०) मध्ये (५०)वर्षापासून अतिक्रमण करून नागरीक कुटुंबासह वास्तव्य करुन रहात आहेत. परंतु अद्यापही प्रशासनाकडुन कसल्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्यामुळे अनेकांना जागेचा हक्काचा ८'अ' नसल्यामुळे अनेक गरीब नागरीकांना घरकुल योजनेपासून वंचित रहावे लागत आहे. त्यामुळे त्यांना पक्के घर बांधकामापासून वंचित राहावे लागत आहे. गरिबांना जागा देणे क्रमप्राप्त असल्याचे मा. न्यायालयाने जाहिर केलेले असताना सुद्धा ग्रामपंचायत कार्यालयाकडून जागेचा बोगस ८ 'अ' उतारा देऊन दुर्लक्ष केले जात आहे. या साठी मा. जिल्हाध्यक्ष यांनी मौजे डिकसळ येथील उपलब्ध गायरान जमिनीचे व बेकायदेशीर गरीब अतिक्रमण धारकांचे सर्वेक्षण करून घरकुला पासून वंचित राहणाऱ्या कुटुंबांना सध्या वास्तव्य करीत असलेल्या ठिकाणच्या जागेचा ग्रामपंचायत स्तरावर अभिलेखात पक्की नोंद करुन ८'अ' देण्याकरीता संबंधितांना आदेशीत करावे अशी मागणी करण्यात आली आहे. सदरील निवेदनाची कळंब पंचायत समिती गट विकास अधिकारी व ग्रामपंचायत कार्यालय यांना पत्र देऊन कळवले आहे. सदरील प्रकरणी योग्य तो न्याय न मिळाल्यास आंदोलन केले जाईल असा इशारा देण्यात आला आहे. दिलेल्या निवेदनावर बहुजन जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष विकास शिवाजी गायकवाड यांची स्वाक्षरी आहे.

## नांदगाव हद्दीत त्या पोलीसांनी तडजोडीने वाळूच्या गाड्या सोडल्याचा आरोप



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहमदनगर :** नांदगाव (ता.नगर) येथील के.के. रेंज लष्करी हद्दीतील कापरी नदीतून मोठ्या प्रमाणात सर्रास वाळू उपसा सुरु असून, पोलिसांच्या आशीर्वादाने वाळू तस्करांना अभय मिळत असल्याचा आरोप अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने करण्यात आला आहे. अवैध वाळू उपसा करुन घेऊन जाणाऱ्या ६ वाळूच्या हायवा गाड्या एमआयडीसी येथील काही पोलीस कर्मचाऱ्यांनी पकडून व नंतर त्यांच्याशी आर्थिक देवाणघेवाण करुन गाड्या सोडून दिल्याचे व्हिडिओ तक्रारदार राजू पवार, समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे व पारनेर तालुकाध्यक्ष निवृत्ती कासुटे यांनी जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांना निवेदनासह सादर केले. तर हप्ते घेणाऱ्या त्या पोलीस कर्मचारीवर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा २१ ऑक्टोंबर पासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

के.के. रेंज या लष्करी भागातील कापरी नदीत मोठ्या प्रमाणात सुरु असलेल्या अवैध वाळू उपसाची अनेकवेळा तक्रार व उपोषण करुनही कारवाई करण्यात आलेली नाही. महसूल मंत्री यांनी काढलेल्या आदेशाची व नियमांची पायमल्ली करून मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरु आहे. वाळू तस्करांशी आर्थिक हितसंबंध जोपासून महसुल व पोलीस प्रशासन कारवाई करण्यास पुढे येत नाही. अवैध वाळू वाहतुकीपासून ढवळपुरी (ता. पारनेर) व नांदगाव शिंगवे (ता. नगर) येथील ग्रामस्थांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सध्या सहा वाळू काढण्याच्या बोट सुरु असून, वीस ते पंचवीस हायवा टिप्पर वाळू घेऊन भरधाव वेगाने चालत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. नुकतेच एमआयडीसीचे पोलिस कर्मचारी, दुचाकीवर येवून ढवळपूरी ते जांभूळबंद रोड,कोंडीबाची वाडी हद्दीत वाळूने भरलेले सहा हायवा डंपर पकडण्यात आले होते. मात्र काही तासांनी तडजोड करून त्या सोडून देण्यात आले. या संदर्भातील व्हिडिओ तक्रारदारांनी घेतला असल्याचा दावा केला आहे. सदर व्हिडिओ शूटिंग मधील गाडीवर आलेल्या पोलिस कर्मचारी यांची चौकशी करून त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## राष्ट्रवादी शरद पवार पक्ष (शिक्षक आघाडी) जिल्हा सचिव पदी प्रा.अविनाश तेली



**अक्षराज : राहुल शिंदे**

**दि.१३, पेठ वडगाव :** राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या शिक्षक आघाडी कोल्हापूर जिल्हा सचिव पदी प्रा.अविनाश तेली यांची निवड करण्यात आली आहे. राज्याचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी राज्यात पक्ष बांधणीसाठी वेगवान हालचाली सुरू केल्या आहेत.शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सोडवणूक करण्यासाठी शरद पवार राष्ट्रवादी पक्षाने शिक्षक आघाडी निर्माण केली आहे. शिक्षण क्षेत्र, शिक्षकांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या शिक्षकांची फळी राज्यभर पक्षाने उभा केली आहे. पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुप्रियाताई सुळे, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शिक्षक आघाडी राज्य प्रमुख दिलीपराव सोनवणे, यांच्या मान्यतेने कोल्हापूर जिल्हाध्यक्ष डी.एस.जाधव, कार्याध्यक्ष बाजीराव पाटील यांनी प्रा. अविनाश तेली यांची जिल्हा कार्यकारणी सचिव पदी नियुक्ती केली आहे. प्रा. तेली हे सध्या शिक्षक लोकशाही आघाडी चे जिल्हा सचिव म्हणून काम पाहत आहेत.

# ग्रामपंचायत उमराठला टी.बी. मुक्त ग्रामपंचायत पुरस्कार प्रदान



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, रत्नागिरी :** राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत टी.बी.मुक्त ग्राम पंचायत पुरस्कार सन २०२३ वितरण सोहळा छत्रपती शिवाजी सभागृह जिल्हा परिषद रत्नागिरी येथे पार पडला. टी.बी. मुक्त ग्रामपंचायत सर्वे क्षणात महाराष्ट्रातील २२५० ग्रामपंचायत पात्र झाल्या होत्या. त्यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील ८४६ ग्रामपंचायतीं पैकी ४२ ग्रामपंचायती टी.बी. मुक्त ग्राम पंचायती म्हणून पात्र ठरल्या.

त्यामध्ये गुहागर तालुक्यातील ग्रामपंचायत उमराठ आणि ग्रामपंचायत पाभरे-कुटगीरी या दोन ग्रामपंचायतींना गौरविण्यात आले.

सदर पुरस्कार सोहळा शासनाच्या आरोग्य विभागाच्यावतीने प्रथमच सुरू करण्यात आलेला आहे. या पुरस्काराचे स्वरूप होते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र. उमराठ ग्रामपंचायतीच्यावतीने उपसरपंच सुरज घाडे आणि ग्रामपंचायत कर्मचारी नितीन गावणंग यांनी हा पुरस्कार स्विकारला.

उमराठ गावातील लहान-थोर ग्रामस्थांच्या उत्तम आरोग्य सेवेसाठी सतत परिश्रम घेणाऱ्या सहकाऱ्यांचे/ कर्मचार्यांचे यामागे मोठे योगदान आहे. सदर पुरस्कार मिळण्यामागे हेदवी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत असलेल्या उमराठ आरोग्य उपकेंद्राच्या समुदाय आरोग्य अधिकारी प्रिया उरकुडे, आरोग्य सेवक अजय हळये, आशा सेविका रूचिता कदम, वर्षा गावणंग, अंगणवाडी सेविका राधा आंबेकर, वर्षा पवार, सारिका धनावडे, मदतनीस निलम जोशी, समृद्धी गोरिवले, शाळेतील शिक्षकवर्ग, ग्राम पंचायत कर्मचारी तसेच गावातील सर्व ग्रामस्थ यांचे वेळोवेळी उत्तम सहकार्य लाभले, असे ग्रामपंचायत उमराठचे सरपंच जनार्दन आंबेकर यांनी सांगितले.

सदर सोहळ्यास जिल्हा परिषद रत्नागिरीचे मुख्य कार्यकारी अधिकारी किर्ती किरण पुजार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) राहुल देसाई, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध आठल्ये, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.महेंद्र गावडे, वैद्यकीय अधिकारी जिल्हा क्षयरोग केंद्र रत्नागिरीचे डॉ. जोत्स्ना वाघमारे आदि प्रतिष्ठीत मंडळी उपस्थित होती.

# गुहागर जनतेच्या मनोरंजनार्थ 'येक नंबर सिनेमाचा मोफत शो'

### मनसेचे प्रमोद गांधी यांची आगळीक भेट

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, गुहागर :** मराठी चित्रपट सृष्टीसह अवघ्या मराठीजनांच लक्ष लागून राहिलेला राजेश मापुस्कर दिग्दर्शित येक नंबर या बहुप्रतिक्षित चित्रपटाचा अधिकृत टीझर रिलीज होऊन १० ऑक्टोबर २०२४ रोजी हा चित्रपट सिनेमागृहातही प्रदर्शित झाला आहे.

एका राजकीय सभेने टीझरची सुरुवात होते, एकत्र झालेल्या माझ्या सर्व हिंदू बांधवांना, भगिनींना आणि मातांना. असा आवाज ऐकू आला की हा चित्रपट राज ठाकरेंच्या जीवनावर आधारित असू शकतो असे संकेत देतो,नव्हे तर समोर आलेल्या टीझर,पोस्टरमधून राज ठाकरे हे व्यक्तिमत्त्व ह्या चित्रपटाचे काहीतरी अंग आहे हे अधोरेखित होते. सिनेमागृहात हा चित्रपट तुफानी गर्दी खेचत आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर येक नंबर हा चित्रपट जास्तीतजास्त जनतेने पहावा यासाठी मनसेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी गुहागर विधानसभा मतदारसंघातील जनतेसाठी सोमवार दि.१४ ऑक्टोबर २०२४ रोजी राजलक्ष्मी सिनेमा शृंगारतळी येथे दुपारी १२ ते ०३ आणि ०३ ते ०६ ह्या वेळेत मोफत शो चे आयोजन करण्यात आले आहे.




जास्तीत जास्त जनतेला हा चित्रपट पाहता यावा यासाठी गुहागर मनसेच्या वतीने जोरदार नियोजन करण्यात येत आहे,अधिक माहिती साठी ९३७३०९९३९८/ ७२१८१७८७७७/ ८९८३१७८७७७ या मोबाईल नंबर वरती संपर्क साधावा असे आवाहन मनसेचे गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी केले आहे.

# निवोशी दणदणेवाडी अखेर अंधारातून उजेडाकडे; प्रमोद गांधी यांचे विशेष योगदान



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१३, गुहागर :** गुहागर तालुक्यातील निवोशी दणदणेवाडी येथील स्ट्रीट लाईट जवळ जवळ गेले पाच ते सहा महिने बंद असून त्यावर पालशेत -निवोशी ग्रामपंचायतीकडून कोणतीही दुरुस्ती उपाययोजना झालेली नसल्याने ऐन गणेशोत्सवात येथील नागरिकांना अंधारमय वातावरणात राहावे लागले होते.

सदर समस्येविषयी ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीकडे प्रत्यक्ष भेट घेऊन पत्र व्यवहार देखील केला आहे, येथील प्रशाशक यांचीही भेट घेण्यात आलेली आहे.

परंतु एक महिना होऊन ही त्यावर ग्रामपंचायत कोणतीही उपाययोजना करताना दिसत नाही. मात्र याबाबत सविस्तर वृत्त प्रसारित होताच महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांनी निवोशी दणदणेवाडी ग्रामस्थांची सदर भेडसावणारी समस्या लक्षात घेऊन तात्काळ त्यांनी ग्रामस्थांना दिलासा देत सदर वाडी क्षेत्राकरीता सौरऊर्जे वरील दिवे लावण्याचे येथील सामाजिक कार्यकर्ता उदय दणदणे यांना आश्वासन दिले.

त्याप्रमाणे तात्काळ येथे सौरऊर्जे वरील विविध सोलर पॅनलचे दिवे लावण्याची चाचपणी सुरू करून येथे संपुर्ण वाडी क्षेत्रात सौर ऊर्जेवरील विविध टेक्नॉलॉजी असलेले दिवे लावण्यात आले. दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर अखेर दणदणेवाडी ग्रामस्थांना अंधारातून उजेडाकडे आणण्याचे महान कार्य मनसेचे प्रमोद गांधी यांनी केले आहे.

हे सौरऊर्जावरील दिवे लावण्याबरोबरच याठिकाणी वेगळा प्रयोग करण्यात आला आहे, सर्व साधारणपणे स्ट्रिट लाईटची संकल्पना ही एखाद्या पोलवर सौर पॅनल त्यावरच बॅटरी व त्यावरच लाईट अशी असते, मात्र अनेक ठिकाणी हे सर्व सामान चोरीला जाते व परिणामी ज्यासाठी आपण लाईट लावला आहे तो अंधार दूर होत नाही व आपल्याला प्रकाश मिळत नाही. मात्र आपण खांबावर फक्त लाइट लावला आहे बॅटरी व पॅनल मात्र घरामध्ये सुरक्षित ठेवले आहेत.

त्यामुळे त्यांची चोरी होणार नाही व हे पूर्ण बारा तास चालू राहतील, अशा क्षमतेची बॅटरी लावण्यात आली आहे उन्हाळा, पावसाळा, हिवाळा तिनही ऋतूंमध्ये हे लाइट चालू रहातात, चोरीचा प्रश्न उद्भवत नाही, बॅटरी व पॅनल चांगल्या दर्जाचे असल्यामुळे लाईट रात्रभर चालू असतात, व त्याला स्वयंचलित सेंसर असल्यामुळे काळोख पडल्यावर लाईट आपणहून चालू होते व सकाळ नंतर आपणहून बंद होते व बॅटरीचा चार्जिंग मोड चालू होणार अशी अद्ययावत यंत्रणा लावण्यात आली आहे.

यामुळे रात्रभर लाइट चालू असल्यामुळे एखादा जंगली प्राणी आला तरी सावध रहाता येईल. याप्रमाणे हे सौरऊर्जेवरील दिव्यांचे काम संपूर्ण निवोशी गावात प्रथमच झाले असल्याने ते लक्षवेधी ठरत आहे. तर ग्रामस्थांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे,महाराष्ट्र नवनिर्माण सेना तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी यांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार मानले आहेत.

# गावा-गावात बुथ सशक्तीकरणाचा काँग्रेसचा निर्धार...



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** जिल्ह्यातील प्रत्येक गावात बुथ सशक्तीकरणासह काँग्रेसची विचारधारा आणि ध्येय धोरणे घराघरात पोहोचविण्याचा निर्णय प्रदेश काँग्रेस कमिटीने घेतला आहे. यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग घेऊन मोट संघटन बांधण्याचा निर्धार केला आहे.

बुथ सशक्तीकरणाच्या माध्यमातून भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते व विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, तसेच संशोधन विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष विकास यादव यांच्या नेतृत्वाखाली देशभरात 'वन बुथ टेन युथ' मोहीम राबवली जात आहे. महाराष्ट्रातही काँग्रेसच्या संशोधन विभागाच्या वतीने ही मोहीम मोठ्या प्रमाणात राबवली जात आहे. नांदेड जिल्ह्यात संशोधन विभागाचे प्रदेशाध्यक्ष माधव हामंद यांच्या नेतृत्वाखाली प्रत्येक तालुक्यात आणि गावागावात काँग्रेसची विचारधारा, विकासाची दूरदृष्टी, सर्वधर्मसमभावाची भावना, तसेच देशसेवेसाठी काँग्रेसने दिलेले बलिदान या सर्व मुद्द्यांची शिदोरी घेऊन काँग्रेस कार्यकर्ते घराघरात राष्ट्रीय एकात्मता आणि शांततेचा संदेश पोहोचविणार आहेत.

महाराष्ट्र युवक काँग्रेस धोरण व संशोधन विभागाच्या वतीने राज्यभरात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली काँग्रेस पक्षाने बुथ सशक्तीकरण आणि ध्येय धोरणे गावागावात पोहोचविण्याची मोहीम हाती घेतली आहे.

धोरण व संशोधन विभागाचे प्रदेशाध्यक्ष माधव हामंद डोणगांवकर यांच्या संकल्पनेतील ही मोहीम जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आणि गावागावात प्रभावीपणे राबवण्याचा काँग्रेस कार्यकर्त्यांनी निर्धार केला आहे. यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची बैठक घेऊन सर्वसमावेशक मार्गदर्शन केले जात आहे. ही मोहीम यशस्वीपणे राबवण्यासाठी काँग्रेसचे दक्षिण जिल्हाध्यक्ष हनुमंत पाटील बेटमोगरेकर, उत्तर जिल्हाध्यक्ष बी.आर. कदम, कार्याध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर, पप्पू पाटील कोंढेकर, बालाजी चव्हाण यांच्यासह प्रत्येक तालुक्यातील काँग्रेस पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी हे अभियान प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार केला आहे.

# रेल्वे पुलाखाली मार्गावरील खड्ड्यामुळे रहदारी कर्ते त्रस्त

## नादुरुस्त अवस्थेतील भुयारी मार्गाची दुरुस्ती करा

**अक्षराज : राजू गागरे**

**दि.१३, झरी (यवतमाळ) :** मुकूटबनवरून दक्षिणेणेकडे जाणारा बैलंपूर मार्ग आहे. या मार्गावर रोड क्रास रेल्वे पुल भुयारी मार्ग असून त्याठिकाणी ऐन रहदारीच्या मार्गावर उतार भागात खड्डा पडलेला आहे.

हा खड्डा दुचाकी चारचाकी वाहन चालकांना नुकसानीचा ठरत आहे. हा मार्ग बैलंपूर, पिंप्रडवाडी, हीरापूर, राजूर, पिंप्रड गुडा अशा अनेक गावांना जोडणारा मार्ग आहे. एवढेच नव्हे तर एम.पी बिर्ला गृप माईन्स सह पैनगंगा नदी पलीकडच्या गावकर्यांना देखील या मार्गाचा उपयोग होतो.



त्यामुळे या मार्गावर सतत २४ तास रहदारी सुरू असते. परंतु गेल्या २ वर्षांपासून या मार्गावरील रेल्वे पुलाखाली मोठे खड्डे पडलेले आहे. त्यापैकी एक मोठा खड्डा उतार भागात पडला आहे. रेल्वे प्रशासनातील संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्या माध्यमातून रोडक्रास खड्डा खोदून केबल, पाईप टाकून बुजविण्याचे काम केल्याचे वाटते. संबंधितांनी केलेले काम उरकल्यावर निव्वळ माती टाकून थातुरमातुर बुजवल्याने खड्ड्यातील लोखंडी सळया उखडून बाहेर निघाल्या असून रहदारी कर्त्यांना नुकसानकारक ठरत आहे. अनेक दुचाकी चारचाकींचे टायर पंक्चर होत आहे.

**संबंधित रस्ते विभागातील अधिकारी यांनी तात्काळ रेल्वे पुलाखाली पडलेले खड्डे बुजवून रस्ता दुरुस्ती करावी. बाजुलाच असलेला नादुरुस्त भुयारी मार्ग बंद पडलेला आहे. त्या मार्गाची सुद्धा दुरुस्ती करण्यात यावी. जेणेकरून येणाऱ्या व जाणाऱ्या दोन भुयारी मार्गाच्या सुविधेने रहदारी कर्त्यांच्या अपघाताला आळा बसेल व रहदारीस मार्ग उपयुक्त सोयीचा ठरेल.**

या खड्ड्यामुळे दुचाकी चारचाकी शॉकअपचे नुकसानही होत आहे.

येथील उतार भागात पडलेल्या या खड्ड्यामुळे अचानक वाहन चालकांना ब्रेक मारावा लागत असल्याने अनेक रहदारी कर्त्यांना अपघाला सामोरे जावे लागत आहे. अनेकांच्या वाहनांचे नुकसान होत आहे. त्या ठिकाणी डावी साईड व उजवी साईड पुल बांधकाम असून रहदारीसाठी दोन वेगवेगळ्या भुयारी मार्गाची पर्याय व्यवस्था केली आहे.

मात्र दुसरा मार्ग नादुरुस्त चिखलमय अवस्थेत असल्याने एकाच बाजूने रहदारी सुरू आहे. मागील वर्षात बाजूच्या भुयारी मार्गाची दुरुस्ती करण्याबाबत वृत्तपत्रात बातम्या ही प्रकाशित झाल्या आहेत. मात्र संबंधित रस्ते विभागाचे पुर्णता दुर्लक्ष होत आहे. आणि आता तर त्या ठिकाणी पडलेला खड्डा मोठ्या अपघाताला निमंत्रण देत आहे.

त्यामुळे संबंधित रस्ते विभागातील अधिकारी यांनी लक्ष देऊन बाजुचा नादुरुस्त भुयारी मार्गाची दुरुस्ती करण्यात यावी. अपघातास कारणीभूत ठरणारे पुलाखाली खड्डे बुजण्यात यावे. अशी मागणी रहदारी कर्त्यांकडून होत आहे.

# थोडक्यात

## ऐरोलीत उभारण्यात येणार मराठी साहित्यिक सदन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, ऐरोली (नवी मुंबई) :** मराठी भाषेच्या विकासासाठी आणि संवर्धनासाठी जवाहर बाल भवन परिसरात उभारण्यात येणाऱ्या मराठी भाषा भवनाच्या नवीन प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आज करण्यात आले. तसेच नवी मुंबईतील ऐरोली येथे उभारण्यात येणाऱ्या मराठी साहित्यिक सदन इमारत बांधकामाच्या भूमिपूजनासह विविध विकास कामांचे लोकार्पण, भूमिपूजन यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे करण्यात आले. कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक, शालेय शिक्षण आणि मराठी भाषा मंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# माढा मतदारसंघातील २५ वर्षाचा बॅकलॉक भरून काढू - अभिजीत पाटील

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१३, पंढरपूर :** आपले महापुरुष सीमोल्लंघन करून लढाईच्या मोहिमेवर जात होते. तो आदर्श घेऊन मी पुढे जात आहे. इथल्या शेवटच्या घटकाचा विचार करून माढ्याच्या २५ वर्षाचा बॅकलॉक भरून काढण्यासाठी आणि माढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी साथ मिळेल असा विश्वास व्यक्त करत चेअरमन अभिजीत पाटील यांनी माढ्याच्या विकासाचा रथ पुढे नेऊया असे आवाहन दसऱ्याच्या मुहूर्तावर रावण दहन प्रसंगी येथील जनतेला केले. ते माढा येथे आयोजित करण्यात आलेल्या माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सव या कार्यक्रमात बोलत होते.ते पुढे बोलताना म्हणाले की, उद्याच्या काळात फक्त ऊस आणि पाण्यावर बोलून चालणार नाही तर इथल्या शेवटच्या घटकाचा विचार करून माढ्याच्या सर्वांगीण विकासासाठी काम केले पाहिजे, युवक, महिलावर्ग, बेरोजगारी, सांस्कृतिक जडणघडण याचबरोबर ज्या युवकांकडे शेतजमीन नाही त्यासाठी काम केले पाहिजे.

व्यावसायिक करणाऱ्यांना चालना दिली पाहिजे, माढ्याच्या २५ वर्षाचा बॅकलॉक भरून काढावा लागेल. यासाठी येथील जनतेची साथ मिळेल. असा विश्वास व्यक्त करत ते म्हणाले की कायम अधर्मावर, असत्यावर विजय मिळवता येतो. असत्य खूप काळ टिकत नाही. उद्याच्या काळात सत्याच्या बाजूने उभे राहण्यासाठी येथील जनता सज्ज आहे. प्रत्येक युवकाच्या सोबत हातात हात दिल्यानंतर जी तडफ जाणवते ती तडफ उद्याच्या परिवर्तनाची नांदी दिसत आहे असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी त्यांनी माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून कृषीविषयक मार्गदर्शन आणि सायंकाळी संस्कृती कार्यक्रमाचे आयोजन विठ्ठल प्रतिष्ठानच्या माध्यमातून घेण्यात आला असल्याचे सांगत पुढील काळात असे वेगवेगळे प्रयोग घेत नाही. तोपर्यंत येथील तरुणांना ऊर्जा मिळणार नाही. उद्याच्या काळात माढेकरांना अनेक गोष्टी जाणून घ्यायच्या आहेत. यासाठी येणाऱ्या काळात परिवर्तन करावे लागेल. माढ्याच्या भविष्यासाठी सीमोल्लंघन करूया माढ्याच्या विकासाचा रथ पुढे नेऊया असे आवाहन अभिजीत पाटील यांनी यावेळी केले.यावेळी उपस्थित संभाजी ब्रिगेड संघटक दिनेश जगदाळे, डॉ.हनुमंत क्षीरसागर, केवडचे सरपंच पांडुरंग शिरसाट, आबासाहेब साठे, ऋषिकेश तांबिले, आटकेपार झेंडा ग्रुपचेदयानंद महाडिक, उंदरगाव उपसरपंच संजय तांबिले, यशवंत भोसले, सागर मसूरकर, समाधान गडेकर, दत्तात्रय पाटेकर, गोटू नाईक, किरण पाटेकर, दीपक इंगळे, प्रीतम पाटेकर, सुरज बारबोले, जनहित शेतकरी संघटना बालाजी बारबोले यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

# रस्ता अडवल्याने पिंपळनेरमध्ये एकाचा मृत्यू

## उपचाराला विलंब झाल्याने झाले निधन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अ.नगर) :** तालुक्यातील पिंपळनेर येथे पिढ्यानपिढ्या असलेल्या रस्त्यामध्ये नाना मारुती गाडे, राजेंद्र मारुती गाडे, अंजना नाना गाडे, सुजाता राजेंद्र गाडे यांनी त्या रस्त्यात दगड, काट्या, लाकडाचे ओंडके टाकून रस्त्यात अडथळा निर्माण केला आहे. खारवाडी येथील रमेश जंबे आणि सुनीता जंबे यांनी एका खाजगी गाडीतून त्यांचा मुलगा अक्षय यास त्रास होऊ लागल्याने दवाखान्यात घेऊन जात असताना खाजगी वाहन बोलवले व गाडीमध्ये पेशंट घेतले असताना अक्षयच्या आई-वडील यांनी मुलगा खुप आजारी आहे. आम्हाला दवाखान्यात जाऊ द्या. अशी विनंती करून ही रस्ता खुला केला नाही. आणि गाडीला आडवे होऊन या रस्त्याने जायचे नाही. आम्ही तुम्हाला जाऊ देणार नाही. अशा प्रकारे शिवीगाळ करून गाडी अर्धा ते एक तास रस्त्यामध्ये अडवली खारवाडी येथील हाकेच्या अंतरावर असणारी लोक येऊन पेशंट पाहून रस्ता खुला करून दिला आणि पेशंटला दवाखान्यात घेऊन गेले. परंतु दवाखान्यात पोहोचायच्या अगोदरच उपचारापूर्वीच अक्षयला मृत्यूला सामोरे जावे लागले. या रस्ता अडवल्यामुळे अर्धा एक तास उपचाराला वेळ झाला. त्यामुळेच या अक्षयला मृत्यूला सामोरे जावे लागले. या घटनेचा पारनेर पोलिस स्टेशनला गुन्हा दाखला झाला आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत असून आणखी रस्ता अडवणारे हे लोक किती लोकांचा बळी घेणार आहे. असा प्रश्न अंत्यविधी वेळी जनतेतून होत आहे.

# अखेर जिजाऊ चौकासाठी पोलिस चौकी मंजूर; आमदार धस यांच्या पाठपुराव्याला यश




**अप्पर पोलीस महासंचालकाचे असे आहेत आदेश**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९ भाग-१ (प्रशासन), मधील नियम क्र.४ (४) नुसार प्रदान असलेल्या अधिकारान्वये पोलीस अधीक्षक, धाराशिव यांना पोलीस ठाणे आनंदनगर अंतर्गत जिजाऊ चौक पोलीस चौकी निर्माण करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. पोलीस अधीक्षक, यांनी पोलीस ठाणे आनंदनगर येथील उपलब्ध मनुष्यबळामधून जिजाऊ चौक पोलीस चौकीस मनुष्यबळ पुरवावे. तसेच चौकी सुरू' करण्यासाठी आवश्यक तो आवती / अनायतों खर्च हा मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा, व त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.१३, धाराशिव :** धाराशिव शहरातील शैक्षणिक परिसर असलेल्या राष्ट्रमाता जिजाऊ चौकात अखेर स्वतंत्र पोलीस चौकी मंजूर करण्यात आली आहे. तत्कालीन आमदार सुरेश धस यांनी यासंदर्भात विधान परिषदेत तारांकित प्रश्न विचारला होता. दरम्यान, या

निर्णयामुळे शाळा, महाविद्यालय परिसरात सुरू असलेली टवाळखोरी आणि छेडछाडीतून होणाऱ्या वादाच्या घटना रोखण्यास मदत होणार आहे. तसेच या भागातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी ही पोलिसांची मदत होणार आहे. ही पोलिस चौकी आनंद नगर पोलिस ठाण्याच्या अंतर्गत असेल.

धाराशिव शहरातील जिजाऊ चौक, तांबरी विभाग, शिक्षक कॉलनी परिसरात शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, वसतिगृह आहेत. त्यामुळे या भागात विशेषतः शाळकरी मुली, महाविद्यालयीन मुलींचे वास्तव्य आहे. मात्र, मुलींची छेड काढण्याचे आणि त्यातून दोन गटातील वादाचे प्रमाण वाढले आहे.

पालकांनी अनेकदा पोलिसांकडे तक्रारी केल्या. अपेक्षित कारवाया केल्या जात नाहीत. दुसरीकडे शिक्षण सुटण्याच्या भीतीने अशा त्रासाच्या घटनांबद्दल विद्यार्थीनी कुटुंबातही व्यक्त होत नाहीत. मात्र, त्यातून आत्महत्येसारख्या घटना घडू शकतात. टवाळखोरांचा बंदोबस्त व्हावा, अशी अपेक्षा पालकातून व्यक्त होत होती. मात्र, अपुरे संख्याबळ आणि त्यामुळे पोलिसांच्या कामाच्या मर्यादा, यामुळे अडचणी येत असल्याचा असा सूर निघत होता.

या पार्श्वभूमीवर या भागात स्वतंत्र पोलीस चौकी मंजूर करावी, अशी मागणी केली जात होती. अनेक वर्षापासून पोलिस चौकीचा विषय प्रलंबित होता. तत्कालीन आमदार सुरेश धस यांनी शासनाकडे पाठपुरावा करून विधान परिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित करून जिजाऊ चौकातील पोलीस चौकी मंजूर करावी, यासाठी भूमिका घेतली होती. या मागणीची दखल घेऊन शासनाने अखेर ही मागणी मान्य केली असून, अप्पर पोलीस महासंचालक सुनील रामानंद यांनी जिजाऊ चौक येथे पोलिस चौकी मंजूर करण्यात आल्याचे पत्र पोलिस अधीक्षक संजय जाधव यांना दिले आहे. दसऱ्याच्या मुहूर्तावर शहराला ही भेट असल्याचे मानले जात आहे. आनंद नगर पोलिस ठाण्यातील पोलिस स्टाफ या चौकीसाठी नियुक्त करण्याचे आदेश दिले आहेत.

या पोलीस चौकीमुळे या भागातील नागरिकांची अनेक वर्षापासून असलेली मागणी मान्य झाली असून सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

## तायक्कांडो सबर्बन मुंबई संघटनेच्या अध्यक्षपदी संदिप येवले यांची निवड



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१३, मुंबई :** तायक्कांडो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई जिल्हा संघटनेची चौवार्षिक निवडणूक रविवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सायं.५ वाजता स्टार फिटनेस अकॅडमी., ५-कांजूरमार्ग पोलिस स्टेशनच्या बाजूला, कांजूरमार्ग (पू.), मुंबई -४२ येथे घेण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष कै. विनायक गायकवाड यांच्या निधना नंतर तायक्कांडो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई या संघटनेवर तायकवॉडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई तर्फे ऍड हॉक कमिटी काम पाहत होती.

दिनांक १३ ऑक्टोंबर २०२४ रोजी झालेल्या निवडणुकीत संघटनेचे नविन अध्यक्ष संदिप येवले, सचिव संदिप चव्हाण, खजिनदार कल्पेश गोलांबडे तर सभासद म्हणून अमोल म्हात्रे, संतोष कुंभार, वैष्णवी बाणखेले, श्लोक आंचन यांची निवड झाली. तसेच निवडणूक अधिकारी म्हणून धन्यकुमार तलनकर (high Court) यांनी काम पाहिले. तायक्कांडो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई या जिल्हा संघटनेची कार्यकारणी जाहीर झाली असून ही नविन कार्यकारिणी पुढील कामकाज पाहिले. सर्व जिल्ह्यातून या कार्यकारिणीचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# १० तोंडी रावण दहनाची परंपरा कायम; वाईट प्रवृत्तींना तिलांजली

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१३, मुदखेड (नांदेड) :** शहरात गेल्या अनेक वर्षांपासून १० तोंडी रावण दहनाची परंपरा आजही कायम असून वाईट प्रवृत्तींचा समूळ नायनाट करण्यासाठी नागरिकांनी सामुहिक शपथ घेऊन चांगल्या गोष्टीवर विजय मिळविण्यासाठी उपक्रम राबविला जात असेल्याची माहिती आयोजक कैलास गोडसे यांनी दिली आहे.विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर दिनांक १२ ऑक्टोबर रोजी दसमुखी रावण दहनाचे आयोजन करण्यात आले होते. पालखी सोहळा महोत्सव सीमोल्लंघन नंतर मोढा मैदानावर शहरातील महिला, वयोवृद्ध नागरिक येऊन यांच्या उपस्थितीत विजयादशमी दिवशी मनातील रक्तबीज रुपी वासना, द्वेश, लोभ कृतितील वाईट गोष्टी यांचे सामुहिक नामोहरम करण्याची शपथ घेण्यात आली. दशानन रावणाच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन माजी उपनगराध्यक्ष बालाजी गोडसे यांच्या हस्ते करण्यात आले आहे. या वेळी कैलास गोडसे, साईराज गोडसे, सुमित गोडसे, कॉंग्रेस कमिटी मुदखेड तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, रमेश बोडके, गिरिश कोत्तावार, सचिन चंद्रे, गोविंद कालाने, शंकर राठी, संतोष चमकुरे, प्रल्हाद मस्के, संजय सावंत, संदिप गाढे, बाबु गिरी महाराज, कालिदास जंगिलवाड, खंडुराज चिद्रवार, शिवा तरोडेकर, वेदांत शेवटे, गोवर्धन पाटिल, पंजाब मुंगल यांच्यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती.

विजयादशमी दिवशी आराध्य दैवत प्रभु श्रीराम चंद्र यांनी अहंकारी रावणाचा वध केला होता जनसामान्यांच्या व प्रत्यकाच्या मनात या बाबत ची भावना सतत तेवत रहावी या व्यापक हेतुने प्रतिकात्मक रावण दहणाची परंपरा गेल्या अनेक वर्षांपासून सुरू आहे. गेल्या आठ वर्षांपासून हा उपक्रम काँग्रेस कमिटीचे शहराध्यक्ष तथा माजी नगरसेवक कैलास गोडसे यांनी सुरू ठेवला आहे. रावण दहन प्रतिकात्मक पुतळ्याचे अतिशबाजी तनीश,साहित्य तनीस, कडबा, कापड आदिंचा समावेश असतो, शालेय विद्यार्थी वेदांत संदिप गाढे यांनी आपल्या संकल्पनेतून दसोमुखी रावणाचा यांनी उभारलेला प्रतिकात्मक पुतळा सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला होता. या उपक्रमाचे राम भक्तांनी कौतुक केले आहे.

## मांडवे खुर्द शाळेतील चिमुकल्यांनी केले संस्कृत स्तोत्राचे पाठांतर

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अ.नगर) :** तालुक्यातील ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मांडवे खुर्द येथील इयत्ता दुसरीच्या मुलांनी नवरात्रउत्सवाचे निमित्त साधून संस्कृत भाषेतील महिषासूरमर्दीनी अष्टाक्षर स्तोत्राचे पठण केले. हे स्तोत्र लहान मुलांना उच्चारण्यासाठी खूप अवघड असून इयत्ता दुसरीच्या मुलांनी ते वाचून तोंडपाठ केले. ही कौतुकाची बाब आहे. या मंत्रामुळे समृद्धी, ताणतणाव कमी करणे, नकारात्मकतेपासून संरक्षण आणि बौद्धिक व मानसिक विकास यांसारखे फायदे आहेत. स्तोत्र पठण हा नवरात्री उत्सवाचा एक महत्त्वाचा भाग मानला जातो. अध्यात्म आणि भारतीय संस्कृतीत या मंत्राचे विशेष महत्त्व समजते. शाळेमधून असा उपक्रम घेतल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये एक अध्यात्मिक व सकारात्मक भावना तयार झाल्याचे मत शिक्षिका प्रितम बर्वे यांनी व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे मुलांमध्ये आपल्या भारतीय संस्कृती विषयी आदर व अभिमान वाढतो तसेच सांस्कृतिक वारसाही जतन केला जातो. मांडवे खुर्द जिल्हा परिषद शाळेमधे मराठी ,इंग्रजी विषयांबरोबरच संस्कृत भाषेचे धडे दिले जातात. अशा गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे मराठी शाळा आता कात टाकत आहेत. मुलांच्या या संस्कृत पाठांतराबद्दल विद्यार्थी अवनिश विशाल बर्वे, आरवी ज्ञानेश्वर हारदे, ओवी सुनिल गागरे, शिवश्री प्रमोद मिंडे, ईश्वरी संदिप जाधव व वर्गशिक्षिका प्रितम बर्वे यांचे गटशिक्षणाधिकारी सिमा राणे, विस्तार अधिकारी पिंपरकर, केंद्रप्रमुख रविंद्र अनाप यांनी अभिनंदन केले. या उपक्रमाचे शाळेतील मुख्याध्यापक, सर्व शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामस्थ या सर्वांकडून मुलांचे कौतुक होत आहे.